महसूल व वन विभाग
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव**
**(गृह शाखा)**
आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव, ता.जि.जळगाव - 425 001
**दुरध्वनी क्रमांक** - 0257- 2220152 **ई मेल** - homebranchjalgaon@gmail.com

---

**वाचले** :- 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005
2. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897
3. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय ,मुंबई यांचेकडील अधिसुचना करोना2020/प्रक्र.58/आरोग्य 5 दिनांक 14 मार्च, 2020
4.प्राचार्य, ईकरा युनानी मेडिकल कॉलेज ॲन्ड रिसर्च सेंटर,जळगांव

---0000---

क्र दंडप्र-01/कावि/2020/ 361(1) दिनांक 12 जुलै, 2020

## आदेश :-

ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र दिनांक 14 मार्च, 2020 अन्वये करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897 हा दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3 व 4 मधील तरतूदीच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजना भाग म्हणून "सिव्हील हॉसिप्टल व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव येथील रुग्णालय विशेष कोव्हिड-19 रुग्णालय म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

आणि ज्याअर्थी, जिल्हयामध्ये कोव्हिड-19 या विषाणूमुळे बाधित असलेल्या तसेच संशयित रुग्णांची वाढती संख्या पाहता सदर रुग्णांना मोफत उपचारासाठी अजूनही काही रुग्णालये उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, **मी, अभिजीत राऊत, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव** आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 चे कलम 65 अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन जळगांव जिल्हयात करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय योजनांचा भाग व कोव्हिड-19 विषाणूमुळे बाधित / संशयित रुग्णांवर मोफत वैद्यकीय उपचार उपलब्ध होण्याकरीता " **ईकरा युनानी मेडिकल कॉलेज ॲन्ड रिसर्च सेंटर,जळगांव** हे महाविद्यालय **Dedicated Covid Health Center(DCHC)** म्हणून पुढील आदेश होईपावेतो अधिग्रहीत करीत आहे.

सदरच्या महाविद्यालयास आवश्यक असणारे वैद्यकीय साहित्य (मास्क, पीपीई कीट, सॅनिटायझर) तसेच अधिकारी/कर्मचारी जिल्हा शल्य चिकित्सक, जळगांव यांनी उपलब्ध करुन द्यावे. तसेच कोविड-19 रुग्णांची माहिती ही शासनाच्या पोर्टलवर भरुन अद्यावत करणेबाबत संबंधितांना सूचना देण्यात याव्यात.

तसेच संदर्भ क्र. 4 वरील पत्रानुसार, इकरा युनानी मेडिकल कॉलेज अॅन्ड रिसर्च सेंटर जळगांव या रुग्णालयाची इमारत व त्या ठिकाणी उपलब्ध असलेल्या सर्व सोयीसुविधा या जिल्हा प्रशासनास विनामुल्य उपलब्ध राहतील.

सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास सदर बाब ही भारतीय दंड संहिता, 1860 (45) चे कलम 188, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 51 ते 60 तरतुदीनुसार शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश हा आज दिनांक 12 /07/2020 रोजी माझ्या सही व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

जिल्हा दंडाधिकारी जळगांव

**(अभिजीत राऊत)**
जिल्हाधिकारी **तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव**

**प्रत :- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1. आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव
2. पोलीस अधिक्षक जळगांव
3. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव
4. जिल्हा शल्य चिकीत्सक, जळगांव
5. प्राचार्य, ईकरा युनानी मेडिकल कॉलेज अॅन्ड रिसर्च सेंटर,जळगांव

**प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे सर्व स्थानिक वर्तमानपत्रात विनामुल्य प्रसिध्दी द्यावी.